## पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आरक्षण व प्रवेश पात्रता परीक्षेत गुणांची सूट

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागात व संलग्नित महाविद्यालयात मुक्त असलेल्या एम. एससी. परीक्षेत ४५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. मात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खास ५ टक्के गुणांची सूट आहे. म्हणजे मागासवर्गीय उमेदवारास बी.एससी. परीक्षेत ४० टक्के गुण असले तरी असे विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरतात.

२. एलएल. बी. (तीनवर्षीय) व एलएल. बी. (पाचवर्षीय) अभ्यासक्रमासाठी प्रवेश पात्रता परीक्षेत ४५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. मात्र बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या दि. १-७-२००० व नागपूर विद्यापीठाच्या दि. ३०-८-२००० च्या पत्राप्रमाणे अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश पात्रता परीक्षेच्या गुणात ५ टक्के सूट देण्यात आली आहे.

३. तसेच बी. एड. प्रवेशासाठी पदवी परीक्षेत ४५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. परंतु अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती/भटक्या जमातीसाठी पदवी परीक्षेच्या गुणात ५ टक्के सूट देण्यात आली आहे.

४. राज्य शासनाच्या दिनांक ११-७-८७ च्या शासन निर्णयाप्रमाणे विद्यापीठ शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयातील अभ्यासक्रमात खालीलप्रमाणे आरक्षण निर्धारित करण्यात आले आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) अनुसूचित जाती | – | १३% | (२) अनुसूचित जमाती | – | ७% |
| (३) विमुक्त जाती (ए) | – | ३% | (४) भटक्या जमाती (बी) | – | २.५% |
| (५) भटक्या जमाती (सी) | – | ३.५% | (६) भटक्या जमाती (डी) | – | २% |
| (७) इतर मागासवर्गीय | – | १९% | | | |

असे एकूण ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात.

वरील प्रवर्गातील ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार ५० टक्के खुल्या जागांसाठी झाली असेल त्यांची गणना ५० टक्के खुल्या जागांतच केली जाते. त्यांची गणना राखीव जागांमध्ये केली जात नाही.

वरील मागासवर्गीय प्रवर्गातील एखाद्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास ह्या जागा आंतरबदल करून भरण्यात येतात. आंतरबदलासाठी संबंधीत प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची सरमिसळ करून गुणवत्तेनुसार ह्या जागा भरण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरून विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तयार करण्यासंबंधी कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी सर्व शैक्षणिक विभागप्रमुख व प्राचार्यांना निर्गमित केलेले परिपत्रक क्र. एससीटी/एम/एस/ २२४, दिनांक २८ जून, २००२ पुढीलप्रमाणे आहे.

### नागपूर विद्यापीठ

**प्रति,** क्रमांक : एससीटी / एम / एस / २२४

दिनांक : २८ जून, २००२

१. विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख
२. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य,
३. विद्यापीठ संचालित महाविद्यालय / संस्थेचे प्राचार्य / संचालक.

विषय : विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालित महाविद्यालयातील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रवेशासंबंधीच्या निवड याद्या तयार करण्याची कार्यपद्धती.

**महोदय,**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरून विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तयार करण्यासंबंधी खालील प्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.



CamScanner

(१) सर्वप्रथम प्रवेशासाठी अर्ज केलेल्या सर्व पात्रताधारक विद्यार्थ्यांची (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसह) गुणवत्तेनुसार / गुणांकानुसार यादी तयार करावी. एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के विद्यार्थी संख्या ही खुल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र ठरत असल्याने प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के विद्यार्थ्यांचा सर्वप्रथम निवड यादीत समावेश करावा. मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा वरील खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीत समावेश असल्यास त्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावा. त्यांचा समावेश मागासवर्गीय प्रवर्गासाठी तयार केलेल्या यादीत करण्यात येवू नये.

(२) वरील खुल्या प्रवर्गातील यादीत समाविष्ट असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा नंतर खालोखाल गुणवत्ता / गुणांक प्राप्त केलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची खालील टक्केवारीनुसार प्रवर्गनिहाय निवड यादी तयार करावी व त्याप्रमाणे प्रवेश द्यावा.

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | | - | १३% |
| अनुसूचित जमाती | | - | ७% |
| विमुक्त जाती | (अ) | - | ३% |
| भटक्या जमाती | (ब) | - | २.५% |
| भटक्या जमाती | (क) | - | ३.५% |
| भटक्या जमाती | (ड) | - | २% |
| इतर मागासवर्गीय | | - | १९% |

(३) शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक / निर्णयानुसार अपंग, सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले (अॅक्टीव्ह सर्व्हिसेस) / कर्मचारी तसेच माजी सैनिक यांची पाल्ये व खेळाडू ह्या वर्गवारीत विद्यार्थ्यांना त्यांच्या विहित टक्केवारीनुसार त्यांच्या संबंधीत खुल्या किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील राखीव जागांमधून आडवे (Horizontal) आरक्षण देण्यात यावे.

(४) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहील्यास त्या जागांपैकी एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीतजास्त २ टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय (S. B. C.) उमेदवारांस गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही घ्यावी.

(५) वरीलप्रमाणे २ टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय उमेदवारास प्रवेश देवूनही परिच्छेद २ मध्ये दर्शविलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात त्यांना विहित केलेल्या टक्केवारीनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या मागासवर्गीयांना इतर प्रवर्गातुन गुणवत्तेनुसार खालील गटाअंतर्गत आंतरबदल (Inter-Changability) तत्वानुसार भरण्यात याव्या.

| | | | |
|---|---|---|---|
| गट १ : | (i) अनुसूचित जाती | (ii) अनुसूचित जमाती | |
| गट २ : | (i) विमुक्त जाती (अ) | (ii) भटक्या जमाती (ब) | |
| गट ३ : | (i) भटक्या जमाती (क) | (ii) भटक्या जमाती (ड) | (iii) इतर मागासवर्गीय |

(६) एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० टक्के जागांवर महिलांना प्रवेश देणे आवश्यक असल्याने खुल्या व सर्व राखीव प्रवर्गात ३० टक्के जागांवर महिलांना प्रवेश मिळेल याबद्दल दक्षता घ्यावी.

(७) मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार शैक्षणिक सत्र २००२-२००३ पासून वरील कार्यपद्धतीचा अवलंब करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

आपला,

**सुभाष बेलसरे**

कुलसचिव, नागपूर विद्यापीठ



CamScanner